महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा चौकशी आयोग

(महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित नऊ परीक्षांमधील गैरव्यवहारासंदर्भात)

प्रेस नोट

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नऊ परीक्षांमधील गैरव्यवहारांची चौकशी निवेदने सादर करण्यास २३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका फुटल्याच्या कथित प्रकरणांची चौकशी करण्यासाठी गठीत केलेल्या चौकशी आयोगाने या प्रकरणांशी संबंधित माहिती असलेल्या व्यक्ती, परीक्षार्थी/विद्यार्थी यांनी आपली निवेदने आयोगाद्वारे निश्चित प्रतिज्ञापत्राच्या प्रारुपात **१६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत** सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. दिपावली सणानिमित्त असलेल्या सुट्टीच्या पार्श्वभूमीवर प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या सदर कालावधीत **२३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत** वाढ करण्यात येत आहे.

सबब सर्व संबंधितांनी आपली निवेदने मराठी किंवा इंग्रजी भाषेत विहित प्रतिज्ञापत्र प्रारुपात आयोगाकडे सादर करावीत. निवेदनासोबत वैध ओळखपत्राची प्रत आणि संबंधित कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे स्वप्रमाणीत प्रतिज्ञापत्राची प्रत, निवेदनाची व कागदपत्रांची एक प्रत complaints.inquirycomm.mpsc@maharashtra.gov.in या ई-मेलवरही पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

तक्रारी दाखल करण्यासंदर्भात आवश्यक माहिती/मदतीकरीता ०२२-२०८६७६७७ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. सदर मुदतवाढ ही उक्त दिनांकापर्यंत देण्यात येत असून, त्यानंतर प्राप्त होणारी कोणतीही प्रतिज्ञापत्रे स्विकारली जाणार नाहीत. तरी विहित मुदतीत प्रतिज्ञापत्रे सादर करण्याचे आवाहन श्री. तुकाराम मुंढे, सदस्य सचिव चौकशी आयोग यांनी केले आहे.

-स्वाक्षरी-

(तुकाराम मुंढे, भा.प्र.से.)
सदस्य सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा चौकशी आयोग